# साक्षिदाराची पडताळणी

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २८४/२०२४** **निशाणी क्र.८**

फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष,

मी देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जे सांगेन ते सत्य असेल,

संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | कुणाल सुभाष जाधव, |
| माझे वय | : | १४ वर्षे, धंदा : शिक्षण, |
| राहणार | : | शेल्हाळ, ता. उदगीर, जि. लातूर. |

दि.२४.११.२०२४ रोजी माझी आई सकाळी अंगण झाडून काढत असताना आदिनाथ बालाजी कांबळे हा तेथे आला व माझ्या आईच्या अंगावर थुंकला व तिल्या घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. त्यावेळी मी आदिनाथ कांबळे यांना माझ्या आईला अशी शिवीगाळ करु नका असे म्हणालो असता त्याने माझ्या गच्चीला धरुन मला नालीत लोटले. त्यावेळी आदिनाथ कांबळे याचे आई–वडील आले व माझ्या आईचे हात पाय धरुन तिला मारहाण केली. तिचे केस धरुन त्यांनी लुचले व पट्ट्याने मारहाण केली. आमचा गोंधळ ऐकून सैदू कांबळे, जनार्धन कांबळे हे सोडवायला आले असता त्यांना देखील शिवीगाळ करुन आरोपींनी बाजूला ढकलून दिले. याव्यतिरिक्त मला काहीही सांगायचे नाही.

(प्रस्तुत साक्षीदारास विचारलेले तोंडी प्रश्न व त्याचे तर्कसंगत उत्तर देता येत असल्याबाबत माझी खात्री झाली. तसेच तो जरी बाल साक्षीदार असला तरी त्यास शपथेचे महत्त्व समजते. सदर खात्री झाल्यानंतरच प्रस्तूत पडताळणी नोंदविण्यात आलेली आहे.)

कुणाल

(निवेदकाची स्वाक्षरी)

समक्ष,

३.१०.२०२५

(भालचंद्र रा. झेंडे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्या.क्र.३), उदगीर.

दिनांक : ०३.१०.२०२५